
ISSN-2277-4491

# VIBGYOR

Bi-annual Multi Disciplinary Research Journal
Volume VII No. 1 February 2018






Scanned by CamScanner

# VIBGYOR

Bi-annual Multidisciplinary Research Journal
Volume VII / No. 1 / February 2018

*The VIBGYOR, a plethora of gem studded writings by eminent scholars from across the globe would genuinely usher a new vigour among the intellectuals in the world. The National and International luminaries in the Editorial Board would synchronize the views penned by renowned scholars from far and wide for publication. The biannual Multi-disciplinary Research Journal extends its canvas to all qualitative writings.*

Editor In Chief
**DR. JOBI GEORGE**
Principal
Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Editor
**DR. SUNIL SHINDE**
Associate. Prof. & Head
Dept. of Economics
Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Published By
**Research Journal Publication Committee**
Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
Accredited with Grade B (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru
Dist. Nagpur - 441201(M.S.) India
Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
E-mail : vibgyorbmv@yahoo.in
Website : www.bgm.ac.in

Scanned by CamScanner

**VIBGYOR**

Bi-annual Multidisciplinary Research Journal
Volume VII / No. 1, February 2018

Published By
**Research Journal Publication Committee**
Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
Dist. Nagpur - 441201(M.S.) India
Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
E-mail : vibgyorbmv@yahoo.in
Website : www.bgm.ac.in

**UGC Approved List of Journals**
**Journal No. 46447**

**ISSN-2277-4491**

**Special Edition : February 2018**



**© Author**

Copyright © All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrival system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise without prior permission of the Editor.

The papers included in this publication have been directly reproduced, with minimum edito-rial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the research papers are those of contributors and do not necessarily match the views of Re-search Journal Committee of the college. The Publisher or Editorial Board is not respon-sible for any information contained therein.



**Type Setting**
**Scan Dot Computer,**
Mahal, Nagpur Mobile : 9822565782
E-Mail : aakar100@gmail.com


Scanned by CamScanner

## ASSOCIATE EDITORS

**Dr. M. R. Chavhan**
Dept. of History

**Dr. V.S. Dighore**
Dept. of Sociology

**Dr. Mangesh Kadu**
Dept. of political science

**Dr. M.V. Nandanwar**
Dept. of Marathi

**Dr. R.K. Quraishi**
Dept. of English

**Dr. A.V. Mahawadiwar**
Dept. of Commerce

**Prof. S.V. Vasekar**
Dept. of English

**Prof. A.K. Sarve**
Dept. of Phy.Education

**Dr. R.S. Bahurupi**
Dept. of Commerce

**Prof. Rajshree O.P.**
Librarian

**Dr. Nitisha Patankar**
Dept. of Zoology

**Dr. Sarang Dhote**
Dept. of Chemistry

**Prof. Amit Kalbande**
Dept. of Chemistry

**Dr. Vinita Virgandham**
Dept. of English


**NOTES FOR CONTRIBUTORS :**

- The 'VIBGYOR' bi-annual multidisciplinary research journal will be publishing in February and August.
- The article must be between 3000 to 8000 words, including notes and references.
- All articles should be accompanied by an abstract of 200 words.
- The articles should be in MS-Word format. Articles must be double spaced, with 1-inch margins with "Times New Roman, Font Size 12, Black. Abstract should be in "Time New Roman Font Size 10 (Italic)".
- The images should be of high resolution.
- References should be at the end of the articles in accordance with the Harvard -style manual and arrange in alphabetical order.
- The views expressed in articles published in the journal are those of respective author. The publisher or the editorial board shall in no way be responsible for them.
- Decisions on publication are made pursuant to the referee's comments.
- Writers are requested to provide full details for correspondence: Postal address, day-time phone numbers and Email address (The Email address of writer in the special article will be publishes at the end of the article).
- Articles accepted for publication can take up to six to eight months from date of acceptance in the 'VIBGYOR'.

**Subscription Rates:**

- Institutional (India): INR 5000 for 4 year (8 Issues)
- Individual (India): INR 800 Annual (2 Issues)
- Elsewhere: US$ 50 or equivalent
- Subscriptions are payable in advance by crossed cheques/drafts drawn in favour of the 'Editor in **Chief, VIBGYOR: Bhiwapur Mahavidyalaya,Bhiwapur**


**Address for Correspondence:**
**VIBGYOR:** Bi-annual Multidisciplinary Research Journal
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur. Dist- Nagpur-441201 (M.S.) India.
Phone- 07106-232349, 9423602502, 9422829240
Fax- 07106-232064
Email- vibgyorbmv@yahoo.in


Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. सिंदखेडकर जाधवांची ऐतिहासिक कामगिरी | | |
| २. यशवंत मनोहर यांची कविता | प्रा. डॉ. शरद आर. डवरे | |
| ३. भारतीय शेतकरी आणि भारतीय कृषी विषयक धोरण | डॉ. जगदिश्वर मुरारी मेश्राम | ७ |
| ४. नोटबंदीमुळे अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम | प्रा.डॉ. राजेश पी. कांबळे | १० |
| ५. आमनेर किल्ला - एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप | प्रा. डॉ. सुरेंद्र पोथारे | १३ |
| ६. महात्मा ज्योतिबा फुलेंचा सामाजिक विचार | प्रा. डॉ. विलास भा. फरकाडे | १७ |
| ७. चिमूरचे श्रीहरी बालाजी मंदीर : ऐतिहासिक दर्शन | प्रा. डॉ. लखपती वा. गायकवाड | १९ |
| ८. कुसमायोजित विद्यार्थ्यांच्या विविध समस्या, उपाययोजना | प्रा. डॉ. नथ्थु सिताराम गिरडे | २२ |
| व पालकांची भुमिका | डॉ. सौ. शुभांगी अ. रोडे | २५ |
| | | २७ |
| ९. नागपूर जिल्ह्यातील म्हाडाच्या मध्यम उत्पन्न गटातील गाळ्यांचे गृहआयोजन सिध्दांतानुसार मूल्यमापन | डॉ. सुजाता साखरे | ३० |
| १०. नागपूर जिल्ह्यातील धर्मांतरीत बौध्दाच्या आर्थिक समस्या | प्रा. किशोर जगन्नाथ शेन्डे, डॉ. सुनिल शिंदे | ३३ |
| ११. नागपूर जिल्ह्यातील पंच जलसिंचन प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या गावातील शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषनात्मक अध्ययन | विजय मारोतराव रांडे, डॉ. सतिश पुंडलीकराव डुडुरे | ३५ |
| १२. बंजारा समाजातील राजकीय स्थित्यंतरे | डॉ. मोतीराज रा. चव्हाण | ३९ |
| १३. विदर्भातील पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या विकासात्मक प्रयत्नांचा आढावा व विकासासंबंधी स्थानिक नागरीकांच्या अभिवृत्तीचे अध्ययन | प्रा. डॉ. दिलीप चव्हाण | ४२ |
| १४. ग्रामीण कृषी उद्योग आणि लहान शेतकऱ्यांचा विकास : समस्या आणि आव्हाने | डॉ. गजानन भा. पाटील | ४५ |
| १५. खेळाडूवर आहाराचा प्रभाव | प्रा. आदित्य किशोर सारवे | ५० |
| १६. नागपूर शहरा[illegible]निक प्रतिष्ठानाकडून सी.एस.आर. [illegible]ात येणारे विविध कार्यक्रमाचे अध्ययन | डॉ. अशोक धोटे | ५२ |
| १७. ऐतिहासिक कागदपत्रांची निवड | | |
| १८. बाबु हरिदास आवळे व कामगार चळवळ : एक समिक्षात्मक अध्ययन | डॉ. महेंद्र गायकवाड | ५५ |
| १९. भंडारा जिल्ह्यातील साहित्य कलेत गुंतलेला आदिम समाज | प्रा. डॉ. सी. एस. पाटिल | ५८ |
| २०. भंडारा जिल्ह्यातील स्त्रियांची अप्रकाशित लोकगीते | डॉ. मधुकर वि. नंदनवार | ६२ |
| २१. भंडारा जिल्ह्यातील अप्रकाशित लोकगीतांचे वाङ्मयीन सौंदर्य | सदानंद कोठीराम जांगळे | ६५ |
| २२. महिला सशक्[illegible] : एक दृष्टीकोन | सदानंद कोठीराम जांगळे | ६७ |
| २३. शालेय [illegible]व्यक्तीमत्वावर पडणारा प्रभाव: एक विश्लेषण | प्रा. डॉ. विमल राठोड | ६९ |
| २४. न[illegible] युगातील "शिक्षक ग्रंथपाल" - एक सर्वेक्षण | प्रा. डॉ. अनिता विवेक महावादीवार | ७२ |
| २५. यशवंत मनोहर यांच्या कवितेची भाषा | प्रा. प्रेमा ए. कुभंलकर | ७६ |
| २६. गौतम बुदधाचा स्त्रीविषयक दृष्टिकोण | वैशाली धनविजय | ७९ |
| २७. मानवी अधिकार आणि एड्स | डॉ. दीपाली डी. भावे | ८२ |
| २८. मराठी नाटकांचे सांस्कृतिक योगदान | प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने | ८४ |
| २९. युगपुरुष शिवराय : एक आकलन | डॉ. रवींद्र शोभणे | ८६ |
| ३०. लोकमाता अहिल्यादेवी होळकर | प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. वन्सोड | ८८ |
| ३१. स्थानिक नागरीकांच्या अभिवृत्तीचे अध्ययन | प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे | ९२ |
| ३२. विदर्भातील पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या विकासात्मक प्रयत्नांचा आढावा व विकासासंबंधी | प्रा. हरेश टि. गजभिये | ९४ |
| ३३. जागतिकीकरण आणि सामाजिक प्रश्न | | |
| ३४. विदर्भ के मुस्लिम बहुल क्षेत्र के छात्रों की सामाजिक एवं आर्थिक परिस्थिती का उनकी अभिवृत्ति पर होने वाले परिणामों का अध्ययन | डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. अनिल बोपचे | ९७ |
| | नाजिश इरम तुफैल अशर, डॉ. एन.ए. काजी | ९९ |
| ३५. डॉ. बाबासाहब आम्बेडकर के नागपूर धम्मदीक्षा समारोह में वामनराव गोडबोले का योगदान | डॉ. सुर्यकांत महादेवराव कापर्शीकर | १०१ |
| ३६. बुध्द और उनका अष्टांग मार्ग | डॉ. अतुल महाजन | १०३ |




Scanned by CamScanner

# बंजारा समाजातील राजकीय स्थित्यंतरे

❑ डॉ. मोतीराज रा. चव्हाण
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर

**प्रस्तावना :**

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत बंजारा समाजाची सामाजिक, सांस्कृ तिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक बाबतीत बरीच स्थित्यंतरे झाल्याची दिसून येतात. प्रत्येक समाजातील परिवर्तन किंवा स्थित्यंतरे हे त्या समाजातील वैशिष्ट्ये मानावी लागेल. बंजारा समाजातील प्रत्येक क्षेत्रात झालेला बदल हे या समाजाला उच्च स्तरावर नेणारे आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. परंतु, काही बाबींचा विचार करता ते परिवर्तन समाजाच्या संस्कृ तीवर आळा घालणारे ठरू शकते. परंतु, आजच्या विज्ञानयुगात जर टिकायचे असेल तर या बाबींकडे दुर्लक्ष करावे लागेल. मनुष्य हा मुळात परिवर्तनशील प्राणी आहे. आदिमानवापासून आजपर्यंत मनुष्याच्या प्रत्येक घटकामध्ये बदल झाल्याचे दिसून येते. मनुष्य हा बुद्धिवादी असल्यामुळे वेगवेगळे शोध तो लावत गेला. त्यामुळे त्याच्यात बदल होणे अपरिहार्य होते.

बंजारा जमातीचा प्'ाचीन व मध्ययुगीन काळाचा परामर्श घेतल्यास असे लक्षात येते की, त्यांना कोणताही राजकीय इतिहास नव्हता. इतिहासात अनेक राजघराण्यांचा राजकीय इतिहास आहे. परंतु, हा समाज आपल्या परंपरागत व्यवसायासाठी (लदेणी) या प्'देशापासून त्या प्रदेशापर्यंत सतत फिरत होता. बंजारा समाजाने निजाम, मोगल, इंग्'ज व मराठे यांचा राजकीय इतिहास जवळून बघितला. तसेच या राज्यकर्त्यांना लागणारी अन्नधान्याची रसद व युद्धसामुग्'ी पोहोचविण्याचे कार्य केलेले होते. बंजारा समाजातील राजकीय व्यवस्था व्यवहार आणि तत्त्व यांचा समन्वय साधणारी होती. या समाजाने काही आदर्श केंद्रबिंदू मानून राजकीय संरचना निर्माण करण्याचा प्'यत्न केलेला होता.

**गोरपंचायत**

भटकी अवस्था असलेल्या या समाजाचे जीवन स्थिर नसल्यामुळे त्याकाळी राजकीय इतिहासाची नोंद झाली नाही. असे असले तरी तांडा संस्कृ ती असलेला हा समाज समूहाने राहत होता. या तांड्यावर 'नायक' ही व्यक्ती महत्त्वपूर्ण समजली जात होती. इतर शासनकाळातील राजाप्'माणे तांड्याचे राजकीय प्रस्थ नायकाकडे देण्यात आलेले होते. तांडा हा नायकाच्या पलीकडे जात नव्हता. कोणत्याही शासकाचा राजकीय इतिहास पाहत असताना असे दिसून येते की, राजा हा त्या राज्याचा सर्वेसर्वा असतो, तसेच सर्व न्यायव्यवस्था आणि प्रशासन राजाकडे एकवटलेली असते. त्याप्रमाणे त्याकाळी तांड्याचा प्रशासक व न्यायव्यवस्थापक हा नायकच होता, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. तांड्यातील न्यायनिवाडे हे नायकच करीत असत. अलिखित कायदे करून त्या कायद्याची अंमलबजावणी नायक करायचे. कोणत्या गुन्ह्यासाठी कोणती शिक्षा द्यायची, हे नियम त्यांनी तयार केलेल्या अलिखित कायद्यात अंतर्भूत असायचे.

पूर्वी तांड्याचे न्यायनिवाडे तांड्यातील नायकच करायचे. तांड्यावर देखरेख करण्यासाठी 'गोरपंचायत' म्हणून प्रशासनाची एक पद्धत तांड्यात रूढ झाली. स्वयंशासित समाजरचनेचे उत्तम उदाहरण म्हणजे तांडा संस्कृतीत अस्तित्त्वात असलेली 'गोरपंचायत' होय. गोरपंचायतीचे न्यायदान करण्यासाठी नायकाला कारभारी तसेच गावातील आसामी, गोरमाटी, नाई, ढाडी, ढालिया व सोनार हे मदत करीत असे. न्यायदान करताना 'नसाब', हसाब', व 'मळाव' अशा वेगवेगळ्या पद्धतीने न्यायदान केले जात असे.

आजही काही गावांमध्ये न्यायपंचायतीद्वारे न्यायनिवाडे केले जातात. आधुनिक काळात 'नायका'ला 'नाईक' म्हणून ओळखले जाऊ लागले. मा. वसंतराव नाईक यांच्या घराण्यात चतुरसिंग नाईक व फुलसिंग नाईक हे त्यांच्या 'गहुली' तांड्याचे नायक होते. परंतु, त्यांच्या कालखंडात नायकाला 'नाईक' या उपाधीने ओळखू लागले. 'नायक' हे पद वंशपरंपरेने चालत असे. पुसद येथे आजही ग्'ामीण भागातील बंजारे गावात काही तक्'ार उद्भवल्यास 'मनोहरराव नाईक' यांच्याकडे न्याय मागण्यासाठी जातात. परंतु, विदर्भाच्या इतर भागातील परिस्थिती ही वेगळी आहे. हा समाज व्यसनाधीनतेने ग्'ासलेला आहे. त्यामुळे तांड्यात, घरात अनेक तक्'ारी निर्माण होतात. पूर्वीसारखे नियंत्रण तांड्यातील नायकांचे राहिले नाही किंवा त्या तोडीचे नायकसुद्धा अस्तित्वात नाहीत. त्यामुळे तांड्यातील प्रकरण आता न्यायालयात जाऊ लागले आहे. अनेक प्रकारच्या तक्रारी आज तांड्यात वाढलेल्या आहेत. कुटुंबातील वातावरणसुद्धा बिघडू लागले आहे. त्यामुळे ठिकठिकाणी सामाजिक स्वैराचार माजला आहे. म्हणूनच आज तांड्यातील बंजारा कोर्टाच्या (न्यायालयाच्या) पायऱ्या चढताना दिसत आहे. पूर्वी बंजारे पोलिसांना खूप घाबरायचे, पोलीस स्टेशन आणि न्यायालय म्हणजे काय? हे त्यांना माहीत नव्हते. परंतु, आज तांड्याची ती परिस्थिती राहिली नाही. या न्यायालयाच्या खेट्यामुळे (येरझारामुळे) त्याचा विपरीत असा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थितीवर पडताना दिसत आहे.



Scanned by CamScanner

## राजकीय स्थित्यंतरे

आधुनिक काळात अनेक प्रकारची स्थित्यंतरे झाल्याचे आढळून येते. त्या स्थित्यंतरांपैकी राजकीय स्थित्यंतरे अतिशय महत्त्वाची आहेत. आजच्या युगात ज्या समाजाचा पुढारी असेल त्या समाजाची प्रगती होईल, अशी धारणा बनत गेली. परंतु, बऱ्याच काळापर्यंत या समाजाला कोणतेही राजकीय नेतृत्व प'ाप्त झालेले नव्हते. हळूहळू या राजकीय स्थितीत परिवर्तन व्हायला सुरुवात झाली. प'ारंभी नायक या पदाला अनन्यसाधारण महत्त्व होते; परंतु नायक हे पद नाममात्र झाले असून अलीकडच्या काळात सरपंच, ग'ामपंचायतचे सदस्य, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेचे पदाधिकारी याला महत्त्व प्राप्त होऊ लागले. इतर समाजाच्या संस्कृ तीचा पगडा तांडा संस्कृतीवर पडला. त्याचाच परिणाम म्हणजे या समाजात झालेली राजकीय स्थित्यंतरे होय.

बंजारा समाज आधुनिक काळात स्थिर झाला आणि त्यांचा संपर्क ग्रामसंस्कृतीशी आणि नागरी संस्कृतीशी होऊ लागला. ज्या ठिकाणी तांड्याची लोकसंख्या जास्त, त्या ठिकाणी तांड्याला ग'ामपंचायतीचा दर्जा देण्यात आला. बंजाराबहुल भागात स्वतंत्र मतदारसंघ उदयास आले. राजकीय क्षेत्रात स्त्रियांनी प्रवेश केला. याअगोदर राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग नगण्य होता. सद्यःस्थितीत स्त्री-पुरुष हे राजकारणात कमी-अधिक प्रमाणात सहभागी होताना दिसत आहे. राजकीय क्षेत्रापासून कोसो दूर असणाऱ्या बंजारा समाजाला महाराष्ट्राचे नेतृत्व करायला मिळाले हा राजकीय स्थित्यंतराचा परिणाम म्हणावा लागेल.

बंजारा समाजाचे मा. वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पदावर एकूण साडेअकरा वर्षे कार्यरत होते, ही समाजासाठी गौरवास्पद बाब म्हणावी लागेल. महाराष्ट्र राज्याला या समाजाने एक मुख्यमंत्री नव्हे, तर दोन मुख्यमंत्री दिले. दुसरे मुख्यमंत्री म्हणून मा. सुधाकरराव नाईक यांचे नाव घ्यावे लागेल. यांची कारकीर्द अल्प राहिली; परंतु या अल्प कारकिर्दीत त्यांनी वेगळी छाप टाकल्याचे दिसून येते. 'नायक' हे पूर्वापार चालत आलेले पद आजही या घराण्यात टिकून असल्याचे दिसून येते. सरपंचपदापासून ते मुख्यमंत्रीपदापर्यंतची भरारी मा. सुधाकररावांनी घेतलेली होती. आजही या घराण्याची राजकीय परंपरा मा. मनोहरराव नाईक पुढे चालवत असल्याचे दिसून येते. ही राजकीय परंपरा काँग्रेस पक्षापासून सुरू झाली. मधल्या काळात नाईक घराण्यावर शरद पवारांचाच प्रभाव पडल्यामुळे नाईक घराण्याने राष्ट्रवादी पक्षात प्रवेश घेतल्याचे आढळून येते.

या समाजातील राजकीय प्रगती दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. नाईक घराण्याच्या व्यतिरिक्त बंजारा समाजात अनेक राजकीय नेते उदयास आले. त्यात मा. मखराम पवार (माजी राज्यमंत्री), मा. हरिभाऊ राठोड (माजी खासदार), मा. गजाधर राठोड (माजी आमदार काँग'ेस), मा. प्रतापसिंग आडे (माजी आमदार काँग्रेस), मा. संजय राठोड (आमदार शिवसेना) यासारख्या नेत्यांचा समावेश करता येईल. याशिवाय पंचायत समिती, जिल्हा परिषदांच्या विविध पदांवर हा समाज विराजमान असल्याचे दिसते.

मुख्यमंत्री व राजकीय पदाधिकारी यांचा कालखंड बंजारा समाजाला राजकीय क्षेत्रात प्रेरणा देणारा ठरला आहे. त्यामुळे या समाजाला राजकीय व सामाजिक सुविधा निर्माण झालेल्या आहेत. परंतु, सत्तेमध्ये असणारा सहभाग हा मात्र समाधानकारक नसल्याचे जाणवते. सहभाग जास्त असेल तर विकासाची संधी मिळत असते. प'त्येकाला संधी मिळाली तर समतेच्या विचारांची जोपासना होते. परंतु, राजकीय वारसा वंशपरंपरागत मार्गाने आल्याने समाजातील इतर नेतृत्वगुण असलेल्या व्यक्तींना राजकीय क्षेत्रात पुढे येण्यास अडचणी निर्माण होऊन समाजाची सर्वतोपरी राजकीय प्रगती खुंटण्यास वंशपरंपरागत वारसा जबाबदार ठरलेला आहे. राजकीय क्षेत्रात वंशपरंपरागता आल्याने समाजाची प'गती खुंटू शकते. समाजाची बांधीलकी जोपासताना राजकीय नेत्यांनी सामाजिक प्रगतीचा केंद्रबिंदू गाठणे गरजेचे आहे. त्यामुळे समाज आपोआप त्याच्या पाठीशी उभा राहील. पण, तूर्तास तरी अशी परिस्थिती दिसून येत नाही. त्यामुळे समाजाला मिळालेले राजकीय नेतृत्व संपुष्टात येण्याची शक्यता बळावत असल्याचे नाकारता येत नाही.

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत बंजारा समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकिय व धार्मिक स्थितीत बरीच स्थित्यंतरे झाल्याचे आढळते. परंतु, या स्थित्यंतरासोबतच अनेक समस्या बंजारासमाजासमोर आ-वासून उभी ठाकल्याचे दिसते.

पूर्वी बंजारा समाजाची न्यायव्यवस्था तसेच सामाजिक व सांस्कृ तिक चालीरीती तांड्यातील नायकाशी केंद्रीभूत होती; परंतु आधुनिक काळात न्यायव्यवस्था संपुष्टात आली आहे. प्रत्येक तांड्यात आजही नायक अस्तित्वात आहे. परंतु, पूर्वीसारखे अस्तित्व नायकाचे राहिले नाही. आज बंजारा समाज आपल्या तांडापद्धतीच्या जीवनशैलीसोबतच ग्रामीण व नागरी स्वरूपाच्या संस्कृतीच्या संपर्कात आल्याने त्याच्या सर्वांगीण विकासात मदत झाली. तसेच राष्ट्रीय एकात्मता वृध्दिस प्रोत्साहन मिळाले. आज शहरामुळे तांड्याचे अस्तित्व संपुष्टात आले आहे.

बंजारा समाजाला राष्ट्रीय प्रवाहात येण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीची गरज आहे; परंतु ही प्रगती साधत असताना समाजातील एकसंघपणा तेवढाच महत्त्वाचा आहे. आजच्या स्थितीचा विचार करता असे दिसून येते की, बंजारा समाज हा वेगवेगळ्या संघटनांचा आधार घेऊन समाजाची प'गती करू पाहत आहे. परंतु, काही संघटना या संधीसाधू असल्यामुळे समाजाच्या प्रगतीला ते बाधक ठरत आहे. त्यामुळे संपूर्ण बंजारा समाजाची राष्ट्रीय पातळीवरील एकच राजकीय संघटना असणे आवश्यक आहे. परंतु, तूर्तास तरी तशी परिस्थिती आढळून येत नाही, हीच समाजासाठी चिंतेची बाब आहे. सद्यःस्थितीत



Scanned by CamScanner

प्र भावी राजकीय नेतृत्व नाहीत. समाजातील राजकीय नेते आपलीच तिजोरी भरण्यात मश्गूल आहेत. त्यामुळे हा समाज अधोगतीकडे जाताना दिसतो. कोणत्याही समाजाची प्र गती ही एकसंघ असल्याशिवाय होऊच शकत नाही. दुसरे कारण शैक्षणिक असमानतेचे आहे. त्यामुळे समाजाचा शैक्षणिक विकास खुंटतो आहे. त्यासाठी शैक्षणिक बाबतीत समानता येणे अत्यावश्यक आहे.

वरील बाबींचा विचार पूर्णत्वाला आल्यास बंजारा समाजाला प्र गतिपथाकडे वाटचाल करण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भ**


१. पवार, रायसिंग, 'मुलाखत', वय ७५ वर्षे, (उमरी, जि. वाशीम) दि. २५ मे २००८.

२. राठोड, पुनाबाई, 'मुलाखत', वय ८० वर्षे. (निराळा, जि. नांदेड), दिनांक २० मे २००७.

३. कित्ता.

४. पवार, किसन, 'मुलाखत', वय ६० वर्षे, (मांडवा, जि. नागपूर) दिनांक २० मे २००९.

५. लांजेवार, विठ्ठल, 'युगस्त्री : सावित्रीबाई फुले' (२००२) पृष्ठ क्र. १०.

६. नाईक, मोहन, 'नसाबी', २०००.

७. शर्मा, श्रीराम, 'बनजारा समाज'(१९८३) पृष्ठ क्र. १५७.


☆☆☆



Scanned by CamScanner